सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

जुलै २०२५। पृष्ठे : ५२

# महाराष्ट्र आरोग्य पत्रिका



॥ भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ॥

# कोल्हापुरात 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' उपक्रमाचा दिंडी सोहळा उत्साहात; आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरांचे मार्गदर्शन

कोल्हापूर, दि. 5 जुलै 2025: आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर येथे 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमांतर्गत भव्य आरोग्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. 'जपुया वारसा संस्कृतीचा, घेऊया आनंद आरोग्य वारीचा' हा ध्यास घेऊन आयोजित कार्यक्रमात भक्तिगीत गायनाचा कार्यक्रम रंगला. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आरोग्य सेवक/लिपिक सेवांतर्गत परीक्षा प्रमाणपत्र वितरण सोहळा पार पडला.

यावेळी बोलताना नामदार प्रकाश आबिटकर म्हणाले, "प्रत्येक आरोग्य कर्मचाऱ्याने आरोग्याची वारी घरोघरी पोहोचवावी, जेणेकरून आरोग्याचे महत्त्व सर्वांना पटेल." त्यांनी प्रशिक्षण केंद्र अद्ययावत करण्याची गरज व्यक्त केली, तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या गरजा ओळखून, गरजेवर आधारित प्रशिक्षण देण्यावर भर देण्याची सूचना केली.

दिंडीमध्ये सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी वारीचा आनंद घेत डेंग्यू व टीबी यांसारख्या विषयांवर पथनाट्ये सादर केली. महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पारंपरिक संस्कृतीचा वारसा जपत आरोग्याच्या ओव्या गायल्या. झिम्मा, फुगडी, रिंगण सोहळ्यांमध्ये आरोग्य शिक्षण देणारे फलक झळकावत जनजागृती करण्यात आली.

प्राचार्य डॉ. योगेश साळे यांनी दिंडीमध्ये विविध अभंग रचनांचे गायन केले, ज्यामुळे जनसमुदाय भक्तीरसात तल्लीन झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य. डॉ.योगेश साळे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा विशद केली. उपस्थितांचे स्वागतही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे नियोजन वैद्यकीय अधिकारी डॉ. विनायक भोई आणि आरोग्य शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती शकिला गोरवाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. खोत (पर्यवेक्षक) आणि श्री. देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले. 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमामुळे कोल्हापुरात आरोग्य शिक्षणाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचले.



महाराष्ट्र
# आरोग्य पत्रिका

वर्ष : सत्ताविसावे | अंक : ७ | महिना : जुलै २०२५

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

मुख्य संपादक/प्रकाशक
**डॉ. कैलास बाविस्कर**
उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

सह संपादक
**डॉ. संजयकुमार जठार**
सहायक संचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

संपादन सहाय्य
**श्री. प्रशांत तुपकरी**
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी

**श्री. महादेव गिरी**
प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा

**e-आवृत्ती**
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग
'परिवर्तन, आरोग्य भवन,
विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६

पत्रव्यवहारासाठी पत्ता
संपादक,
**राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग**
'परिवर्तन', आरोग्य भवन परिसर,
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६.
दूरध्वनी : ०२०-२६६१०१७८, २६६१०१७९.
फॅक्स : ०२०-२६६१०१८०

**e-mail :**
ddhsiec.creatives@gmail.com



**वारकऱ्यांना पुरविण्यात आलेल्या आरोग्य सेवेची पाहणी व विठ्ठलाचे दर्शन घेऊन राज्यातील सर्व नागरिकांना निरोगी आरोग्य लाभो, अशी प्रार्थना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विठ्ठल चरणी केली**

## मोबाईल हेल्थ

/MahaArogyaIECBureau @Mahahealthiec @Mahahealthiec @Mahahealthiec

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे द्वारा प्रकाशित

https://www.facebook.com/MahaArogyaIECBureau

https://twitter.com/MahaHealthIEC

https://www.instagram.com/mahahealthiec/

YouTube http://bit.ly/MahaArogyaYT

https://www.linkedin.com/company/maha-arogya-iec-bureau

संकेत स्थळ :
http.//maha-arogya.gov.in
http.//mahaarogyasamvadiec.in
maharogyasamvad

महाराष्ट्र
आरोग्य पत्रिका

जुलै - २०२५

# अंतरंग


- आयुक्तांचे मनोगत ..... ५
- संचालकांचे मनोगत (मुंबई) ..... ६
- संचालकांचे मनोगत (पुणे) ..... ७
- संचालकांचे मनोगत (शहरी आरोग्य) ..... ८
- संपादकीय ..... ९
- पंढरपूर वारीमध्ये आरोग्य विभागाच्या तयारीचा आढावा आणि पाहणी करताना आरोग्य मंत्री ..... ११
- सार्वजनिक आरोग्य विभागाने ९ लाखांहून अधिक वारकऱ्यांना दिली आरोग्य सेवा ..... १२
- भक्ती आणि आरोग्याचा संगम ..... १३
- "भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची” ..... १४
- सार्वजनिक आरोग्य विभागाने वारी मार्गावर पुरविली ९ लाखांहून अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा ..... १६
- मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन ..... १८
- आरोग्य मंत्र्यांकडून प्रशंसा ..... १९
- आरोग्य राज्य मंत्र्यांकडून अभिनंदन ..... २०
- पंढरीच्या वारीत विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे आरोग्य विभागाची जनजागृती ..... २१
- आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम ..... २२
- पंढरपूर वारी दरम्यान ‘दोस्त मुंबई’ने राबवली एनटीओआरसी बाबत विशेष जागृती मोहीम ..... ३३
- माध्यम प्रतिसाद ..... ३६
- 'आई होण्यासाठी योग्य वय तेव्हा, शरीर व मनाची तयारी जेव्हा’ ..... ३८
- कविता - जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने ..... ४०
- कविता - || भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची || ..... ४१
- कविता - || आषाढीची वारी, आली पंढरीच्या दारी || ..... ४२
- कविता - || वारी एका डॉक्टरची || ..... ४३
- कविता - || ओवी आरोग्याची || ..... ४४
- आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांना आरोग्य सेवा व जनजागृती करताना विभागाचे कर्मचारी ..... ४५
- वृत्त विशेष - आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याकडून फलटण येथे आरोग्य सेवेचा आढावा ..... ४८
- वृत्त विशेष - ‘राष्ट्रीय आरोग्य निधी’गरीब गरजू रुग्णांना दिलासा देणारी योजना ..... ४९
- लेखकांना विनंती ..... ५०
- सर्व सरकारी आरोग्य योजना आणि कार्यक्रमांची माहिती जाणून घेण्यासाठी महाआरोग्य योजना पुस्तिका ..... ५१




०२ कोल्हापुरात ‘आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी’ उपक्रमाचा दिंडी सोहळा उत्साहात; आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकरांचे मार्गदर्शन



११ पंढरपूर वारीमध्ये आरोग्य विभागाच्या तयारीचा आढावा आणि पाहणी करताना आरोग्य मंत्री



२० आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडून फलटण येथे आरोग्य सेवेचा आढावा

# आयुक्तांचे मनोगत



आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या उपक्रमाच्या माध्यमातून ९ लाखांपेक्षा अधिक वारकरी भाविकांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली. आळंदी-देहू तसेच राज्यातील इतर भागातून पंढरपूरपर्यंत जाणाऱ्या पालखी मार्गावर आणि पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिरामध्ये वारकरी आणि भाविकांना आरोग्य सेवा आणि सुविधा पुरविण्यात आल्या. पालखी मार्गावर प्रत्येक ५ किलोमीटर अंतरावर तात्पुरता 'आपला दवाखाना', १०२, १०८ रुग्णवाहिका, महिला वारकऱ्यांसाठी स्त्री रोग तज्ज्ञांची सुविधा, हिरकणी कक्ष, तात्पुरते अतिदक्षता कक्ष, पालखी मार्गावर आरोग्यदूत इत्यादींच्या माध्यमातून आरोग्य सेवा पुरविण्यात आली. पंढरपूर येथे महाआरोग्य शिबिरात वारकऱ्यांना सर्व प्रकारचे निदान, उपचार आणि संदर्भ सेवा विनामूल्य पुरविण्यात आल्या. या शिबिरातून नेत्रविकार, हृदयरोग, किडनी, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, दंतरोग, संसर्गजन्य रोग, कर्करोग यांसारख्या आजारांची तपासणी, उपचार आणि संदर्भ सेवा देण्यात आल्या.

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिरामध्ये होणाऱ्या सोहळ्यासाठी राज्यातील विविध भागांतून दिंड्यांच्या माध्यमातून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. दिंड्यांमधून पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना उन्हाचा तसेच पावसाचा त्रास होऊन आरोग्यविषयक समस्या उद्भवू नयेत, साथीचे आजार पसरू नयेत यासाठी वारी मार्गावर आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक सुविधा पुरविण्याचे नियोजन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले होते. आषाढी वारीनिमित पंढरपूर येथे भेट देणाऱ्या वारकऱ्यांना पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विभागाच्या वतीने सूक्ष्म नियोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगदान दिलेल्या आरोग्य विभागाच्या सर्व आरोग्य अधिकारी, डॉक्टर्स, परिचारिका व कर्मचाऱ्यांचे मी अभिनंदन करतो.

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील जनतेला उत्तम, दर्जेदार व परिणामकारक आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विविध आरोग्य योजना प्रभावीपणे राज्यात राबवण्यात येत आहेत. विभागांतर्गत सर्व आरोग्य केंद्रे व रुग्णालयांमध्ये वैद्यकीय उपचार मोफत उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. आयुष्मान आरोग्य मंदिर, आपला दवाखाना, आपत्कालीन वैद्यकीय सेवा (१०८ ॲम्ब्युलन्स), ई-संजीवनी ओपीडी यांसारख्या योजनांच्या माध्यमातून रुग्णसेवेला अधिक बळकटी प्राप्त झालेली आहे. आरोग्य यंत्रणेचे जाळे अधिक सक्षम करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. पावसाळ्याच्या दिवसात साथीचे आजार पसरण्याचा धोका अधिक असतो. साथीचे आजार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. त्या दृष्टीने आरोग्य विभागाने क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. नागरिकांनी आपली व कुटुंबाची काळजी घ्यावी, तसेच आजाराची कोणतीही लक्षणे आढळल्यास जवळच्या शासकीय आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

धन्यवाद!

**डॉ. कादंबरी बलकवडे**
आयुक्त, आरोग्य सेवा
तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

# संचालकांचे मनोगत



आजारास विविध गोष्टी रोग कारणीभूत असतात. ही कारणे साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव आणि आरोग्यविषयक समस्या निर्माण करीत असतात. विविध ऋतूतही वेगवेगळ्या आजारांचे स्वरूप आपणास पहावयास मिळते, जसे की सध्या पावसाळा असल्यामुळे आपणाला जलजन्य व कीटकजन्य आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर पाहण्यास मिळते. त्यासाठी या समस्येतून बाहेर येण्यासाठी आपण आपले आरोग्यविषयक ज्ञान वाढवून त्याद्वारे आपली, कुटुंबाची व समाजाची काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी शासन स्तरावर विविध माध्यमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येते. याकडे लक्ष देऊन आपण ते आपले कुटुंब व समाज या घटकांसाठी वापरायला हवे, त्यामुळे समाजाची प्रगती होऊन निरोगी समाजाच्या वाटचालीकडे आपण जाऊ लागतो.

जुलै आणि ऑगस्ट हे पावसाळ्याचे महिने असून या महिन्यात साथीचे आजार डोके वर काढतात. या आजारांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेतली पाहिजे. दूषित पाण्याद्वारे पसरणाऱ्या रोगांची मोठी संख्या लक्षात घेता शुध्द व निर्जंतुक करून पाणी वापरण्यावर अधिक भर दिला पाहिजे. साथीच्या आजारांचा सामना करण्यासाठी आरोग्य यंत्रणा तत्पर असून, आजाराची लक्षणे दिसताच नजिकच्या सरकारी दवाखान्यात नागरिकांनी उपचार घ्यावेत.

आजार होऊच नये यासाठी सतर्क राहणे, साथीच्या रोगावर नियंत्रण मिळवणे व उपलब्ध आरोग्य सेवांचा आवश्यकतेनुसार वापर करणे, यामुळे आपण आपल्या आरोग्याचा खर्चही कमी करू शकतो. त्यामुळे आपण अधिक सजग राहून, समाजामध्ये आरोग्यविषयक घटकांबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. सध्या पावसाळा असल्यामुळे जलजन्य आजार व किटकजन्य आजार होऊ नयेत, त्यावर नियंत्रण मिळवता यावे यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य शासनाला आवश्यक आहे. आपला सहभाग हाच समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी महत्त्वाचा घटक असल्यामुळे आपणा सर्वांचे सहकार्य त्यासाठी आवश्यक आहे. पावसाळ्यातील रोगांविषयी आपण काळजी घ्यावी व स्वतःच्या कुटुंबाचे आणि समाजाचे आरोग्य चांगले व्हावे, यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करू या,

शासनाच्या वतीने आरोग्यविषयक योजनांची तसेच रोगांविषयीची माहिती, रुग्णालयात उपलब्ध असणाऱ्या सुविधा तसेच जनकल्याणाच्या आरोग्यदायी योजना याद्वारे लोकांना सेवा देण्यासाठी प्रयत्न केले जातात. समाजाचे आरोग्य निरोगी रहावे या उदात्त हेतूने हे कार्य नेहमीच केले जाते. त्यासाठी आपण शासनाच्या योजनांमध्ये आपला सहभाग देऊन त्या अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. शासनाच्या विविधांगी योजना, विविध कार्यक्रम, मोहिमा याद्वारे जाणीवपूर्वक आरोग्य शिक्षणासाठी प्रयत्न केले जातात. यासाठी आरोग्यसेवक, आरोग्यसेविका अशा विविध घटकांचा यात सहभाग असतो. त्यांना आपण आपले सहकार्य देऊन निरोगी आरोग्यासाठी प्रयत्न करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

**डॉ. नितीन अंबाडेकर**
संचालक, मुंबई

# संचालकांचे मनोगत



जुलै महिन्यात जागतिक लोकसंख्या दिन मोठ्या व्यापक प्रमाणावर साजरा केला जातो. वाढती लोकसंख्या ही जगापुढील सध्याची सर्वात मोठी समस्या आहे. भारताची लोकसंख्या जगात पहिल्या क्रमांकाची असून, क्षेत्रफळाचा विचार करता भारताचा सातवा क्रमांक लागतो. याचा अर्थ छोट्या आकाराच्या भूपृष्ठावर प्रचंड मोठ्या प्रमाणात लोकसंख्या राहत आहे. कुटुंब आणि कुटुंबातील प्रत्येक नागरिक हा शासनाच्या विकासाच्या योजनांचा मुख्य घटक असतो. देशाची लोकसंख्या वाढीची गती अशीच चालू राहिली तर नियोजनाप्रमाणे सर्वसामान्य माणसाला फायद्यांपासून वंचित रहावे लागेल. मात्र गेल्या काही वर्षांपासून सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने चांगली कामगिरी करून लोकसंख्येला आळा घालण्यासाठी सर्व स्तरांवरुन प्रयत्न केलेले दिसून येत आहेत. कुटुंब नियोजनाचे महत्त्व समाजामध्ये रुजविण्याचे महत्त्वाचे कार्य आरोग्य विभागाने यशस्वीपणे पार पाडले असले तरी अजून लढाई संपलेली नाही.

वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील बेकारीचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. त्याचबरोबर वाढती लोकसंख्या ही लोकांच्या दारिद्र्याला पर्यायाने आरोग्याच्या समस्यांना कारणीभूत ठरत आहे. प्रत्येक व्यक्तीने आपले कुटुंब मर्यादित राखणे गरजेचे आहे. आपल्या गरजा मर्यादित ठेवून त्यानुसार उपलब्ध साधन सामग्रीचा वापर केला तर नागरिकांना विकास साधणे सहज शक्य होणार आहे. या लोकसंख्यावाढीचा भार सर्व सेवा-सुविधा पुरविताना शासन स्तरावर पडत असतो. सार्वजनिक आरोग्य विभाग यातूनही मार्ग काढून प्रत्येक आघाडीवर लोकसंख्या नियंत्रणात व जनतेला चांगल्या आरोग्य सेवा पुरविण्यात प्रभावीपणे कार्यरत आहे.

माता आणि बाल आरोग्याच्या बाबतीत आपले राज्य हे देशात नेहमीच अग्रेसर राहिले आहे. मातृत्व हा स्त्रिचा दुसरा जन्म असतो असे म्हटले जाते आणि म्हणून गरोदर स्त्रियांची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. लोकसंख्यावाढीच्या समस्येवर आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. लोकसंख्या नियंत्रणात माता आणि बालकाच्या आरोग्याला प्राधान्य देणे आवश्यक असते. प्रजनन आणि बाल आरोग्य या कार्यक्रमाचा केंद्र बिंदू माता व बालके आहेत. सुरक्षित प्रसूती विषयी सर्व स्तरावरुन विभागामार्फत यशस्वी प्रयत्न करण्यात येत आहेत.

गरोदरपणातील नियमित वैद्यकीय तपासणी अतिशय महत्त्वाची आहे. माता आणि बालक यांच्या सुदृढ आरोग्यासाठी प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम या आणि इतर विविध योजना आणि उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या कार्यक्रमांतर्गत गरोदर मातेची घरापासून ते दवाखान्यापर्यंत आणि बाळंतपणासाठी येण्या-जाण्याची व्यवस्था, होणा-या विविध चाचण्या, औषधोपचार, जेवण, शस्त्रक्रिया या सर्व सोयी-सुविधा मोफत पुरविण्यात येत आहेत. या सुविधांविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याची गरज आहे. त्यासाठी जनसहभाग महत्त्वाचा आहे. १० जुलै मातृ सुरक्षा दिनाच्या निमित्ताने राज्य व जिल्हा स्तरावरुन मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जाणार आहे. समाजामध्ये, विविध माध्यमांतून अथवा कार्यक्रमांचे आयोजन करुन माता-आणि बाल आरोग्याविषयी जाणीव व जागृती व्हावी ही अपेक्षा!

**डॉ. विजय कंदेवाड**
संचालक, पुणे

# संचालकांचे मनोगत



शहरी भागात जलद गतीने वाढणारी लोकसंख्या, बदलती जीवनशैली, प्रदूषण, तणावयुक्त वातावरण यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या गरजा अधिक व्यापक आणि गुंतागुंतीच्या होत आहेत. या पार्श्वभूमीवर शहरी आरोग्य व्यवस्थापन हे अधिक प्रभावी, सुलभ व सर्वसमावेशक असणे आवश्यक ठरते. शहरी भागातील प्रत्येक नागरिकाच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन विविध योजना, उपक्रम व सेवा पोहोचवण्याचा आरोग्य विभागाचा सतत प्रयत्न असतो. केवळ उपचारच नव्हे तर प्रतिबंधात्मक उपाययोजना अतिशय महत्त्वाच्या आहेत.

शहरीकरणाच्या झपाट्याने वाढणाऱ्या लाटेत, आरोग्य ही एक मोठी जबाबदारी ठरते. वाढते प्रदूषण, मानसिक तणाव, जीवनशैलीशी संबंधित आजार आणि दैनंदिन धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता अधिक असते. या पार्श्वभूमीवर, शहरी भागातील आरोग्य सेवा अधिक सुलभ, सर्वसमावेशक आणि मानवी केंद्रित करणे ही काळाची गरज आहे. आरोग्यविषयक योजनांविषयी नागरिकांमध्ये जागरूकता, आणि शासनाच्या उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य अतिशय महत्त्वाचे असून आरोग्य विभागामार्फत समाज माध्यमे, ऑडिओ, व्हिडिओ तसेच इतर अन्य मार्गांनी लोकांमध्ये जनजागृती केली जाते.

आजच्या घडीला आपण केवळ रोगोपचारावर लक्ष केंद्रित न करता प्रतिबंधात्मक उपाय, पोषण, मानसिक आरोग्य, मातामृत्यू दर, बालकांचे आरोग्य आणि नागरिकांच्या सशक्त सहभागावर भर देत आहोत. 'स्वस्थ शहरे' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सर्व घटकांची साखळी एकत्रित काम करत आहे. राज्यातील शहरी भागात आरोग्य सेवा अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि परिणामकारक करण्यासाठी आरोग्य विभाग सातत्याने कार्यरत आहे. शहरी गरिबांसाठी प्राथमिक आरोग्य सेवा, कुटुंब नियोजन, मातृत्व सेवा, बालसंगोपन, तसेच व संसर्गजन्य आजारांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. आज आपण अशा टप्प्यावर आहोत जिथे डिजिटल आरोग्य सेवा, मोबाईल हेल्थ युनिट्स, आणि समुदायाधिष्ठित आरोग्य उपक्रम अधिक महत्त्वाचे ठरत आहेत.

आरोग्य ही केवळ वैद्यकीय सेवा नाही, तर ती एक जीवनशैली आहे. ही जीवनशैली अधिक समृध्द करण्यासाठी आपण सगळे एकत्र काम करत राहू या!

सर्वांना निरोगी, सशक्त आणि आरोग्यपूर्ण जीवनासाठी शुभेच्छा!

**डॉ. स्वप्नील लाळे**
संचालक, शहरी आरोग्य

# संपादकीय

भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची

दरवर्षी पंढरपूरच्या वारीत लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पायीवारी करतात. ही वारकरी परंपरा केवळ श्रद्धेची नाही, तर ती एक सामाजिक आणि आरोग्यविषयक चळवळही ठरू शकते, भक्ती आणि सेवा यांचा संगम साधून आरोग्य विभागाने 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित उपक्रम विभागाच्या वतीने राबविण्यात आला. पंढरपूर वारी ही केवळ धार्मिक यात्राच नाही, ती एक मोठी मानवी चळवळ आहे. या संधीचा उपयोग आरोग्य सेवा, जनजागृती, आणि व्यवहार्य आरोग्य शिक्षणासाठी केल्यास त्याचा प्रभाव व्यापक आणि दूरगामी ठरतो, याच प्रामाणिक हेतूने सेवा व जनजागृती मोहीम लोकसहभागातून राबविण्यात आली.

सार्वजनिक आरोग्य विभागाने "भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची" या संकल्पनेवर आधारित एक अभिनव उपक्रम सुरू केला व लोकसहभागातून यशस्वी करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश केवळ वैद्यकीय सेवा देणे नव्हे, तर भाविकांच्या मनात आरोग्यविषयक जाणीव निर्माण करणे हा होता. वारीमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना प्राथमिक वैद्यकीय तपासणी, जंतुसंसर्ग नियंत्रण, सुरक्षित पाणी पुरवठा, स्वच्छतागृहे आणि मानसिक आरोग्य यांसाठी मदत कार्य करण्यात आले. त्याचबरोबर हिवताप, डेंग्यू, मलेरिया, त्वचारोग आणि डोळ्यांचे आजार, अवयवदान याविषयी जनजागृतीही केली गेली.

सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आरोग्यविषयक संदेश पोचविण्याची ही एक चांगली संधी ठरली. यात्रेचा उत्साह, भक्तीचा ओघ आणि सेवाभाव या त्रिसूत्रीच्या आधारे आरोग्य सेवा लोकांपर्यंत पोचविणे ही एक नवीन जनसंवाद रणनीती ठरली.

आता गरज आहे ती म्हणजे ही जनजागृती उपक्रम वर्षभर राबविण्याची आणि ही आरोग्य सेवा हीच खरी भक्ती आहे, हे भाविकांच्या मनात खोलवर रुजवणे आवश्यक आहे. 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' ही केवळ घोषणा नाही, ती एक चळवळ आहे — जी श्रद्धेच्या वाटेवरून आरोग्याच्या दिशेने चालते. जवळपास ते कि.मी पायी प्रवास करून वारी पंढरपूरला पोहोचते व जवळपास ते लाख लोक या आनंद सोहळ्यामध्ये सहभागी होतात. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य दिंडी, आरोग्य दूत विविध माध्यमाद्वारे जनजागृती तसेच वारी मार्गावर आरोग्य सेवा तसेच पंढरपूर येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन व ठिकठिकाणी तयार करण्यात आलेले अतिदक्षता कक्ष यामुळे या सार्वजनिक भक्ती उत्सवाला आरोग्याची उत्तम साथ मिळाली व सार्वजनिक आरोग्य सेवेच्या प्रत्येक घटकाने आपापल्या परीने वारकऱ्यांची सेवा करण्यासाठी आपले महत्त्वाचे योगदान दिले आहे.

सेवा या उदात्त हेतूने यामध्ये डॉक्टर परिचारिका कर्मचारी हिरीरीने सहभागी झाले व वारकरी भक्तांना त्यांच्या गरजेनुसार आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आरोग्य दूत ठरले. हा उत्सव भक्तिमय व आरोग्यमय होत असतो व याही वर्षी सार्वजनिक आरोग्य विभागाने भक्तांची सेवा मनोभावे करून वारकरी भक्तांच्या मनात आपले स्थान दृढ केले हे विशेष! सार्वजनिक आरोग्य सेवेतील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांचे यानिमित्त आभार मानणे आपले प्रत्येकाचे कर्तव्यच ठरेल.

**डॉ. कैलास बाविस्कर**
संपादक



|| भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ||

# संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज
# जगदगुरु श्री संत तुकाराम महाराज

|| आरोग्याची वारी...पंढरीच्या दारी ||



# पंढरपूर वारीमध्ये आरोग्य विभागाच्या तयारीचा आढावा आणि पाहणी करताना आरोग्य मंत्री



















# भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची

## सार्वजनिक आरोग्य विभागाने १ लाखांहून अधिक वारकऱ्यांना दिली आरोग्य सेवा व विविध माध्यमांतून केली आरोग्य जनजागृती



॥ आरोग्याची वारी पंढरीच्या दारी ॥

| अ. क्र. | पालखी नाव | बाहयरुग्ण संख्या | आंतररुग्ण संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री संत ज्ञानेश्वर महाराज | ३५५४४७ | ९४२ | ३५६३८९ |
| २ | श्री संत तुकाराम महाराज | २२८५६८ | ६१५ | २२९१८३ |
| ३ | श्री संत सोपानकाका महाराज | १९३१७ | ४७ | १९३६४ |
| ४ | मानाच्या इतर पालख्या व दिंडया | ८३९६३ | १४२३ | ८५३८६ |
| ५ | पंढरपूर -संस्था व HBT (बूथ) | ६२५६५ | १०५ | ६२६७० |
| ६ | पंढरपूर — उ.जि.रू. व ट्रामा आयसीयू | ८५०४४ | १८७८ | ८६९२२ |
| ७ | तीन रस्ता शिबिर | ८३५९५ | ० | ८३५९५ |
| | दि. ८ जुलै २०२५ पर्यंतचा अहवाल | ९१८४९९ | ५०१० | ९२३५०९ |



आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी

# भक्ती आणि आरोग्याचा संगम



# ॥ भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ॥

## सार्वजनिक आरोग्य विभाग

"वारी" हा केवळ एक धार्मिक सोहळा नाही, तर ती एक सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक चळवळ आहे. लाखो वारकरी दरवर्षी आपल्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या वाटेवर निघतात. त्यांच्या पावलांशी जोडलेली आहे एक निःस्वार्थ सेवा – आरोग्य सेवा. याच सेवेचे संकल्पवाक्य आहे




### आरोग्य सेवा हीच विठ्ठल सेवा

वारीतील आरोग्य कर्मचारी, डॉक्टर, परिचारिका, स्वयंसेवक, मीडिया समन्वयक – हे सर्व एक संकल्प घेऊन काम करतात. हा फक्त शासकीय आदेश नसतो, ही असते ***"मानवी आरोग्याची भक्ती"***. विठोबाचे दर्शन घेणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याचा प्रवास सुरक्षित आणि आरोग्यदायी व्हावा ही त्यांची विठोबाला अर्पण केलेली सेवा असते.



### योजनेपासून प्रत्यक्ष कृतीपर्यंत

सार्वजनिक आरोग्य विभागाने दरवर्षीप्रमाणे यंदाही सुसंगत नियोजन, संसाधन व्यवस्था, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि प्रभावी संप्रेषण प्रणाली यांचा वापर करून वारीमध्ये सहभाग घेतला. प्राथमिक उपचार केंद्रे, रुग्णवाहिका, मोबाईल हॉस्पिटल्स, तपासणी शिबिरे, औषध वाटप, मानसिक आरोग्य सल्ला सेवा, पाण्याच्या चाचण्या – या सर्व सेवा भक्ति-भावाने पार पडल्या.




### IEC आणि जनजागृती – आरोग्य संवादाचा पूल

या वर्षीचा विशेष भाग म्हणजे "आरोग्याची वारी – पंढरीच्या दारी" ही जनजागृती मोहीम. भित्तीपत्रके, घोषणा, आरोग्य सेवा केंद्रे, टी-शर्ट,गमचा, टीव्ही जाहिरात, वृत्तपत्र व शिबिरांमधून आरोग्य संदेश पोचवण्यात आले. "विठ्ठल नाम स्मरण आणि आरोग्य नियम पालन" यांचा सुंदर संगम साधण्यात आला.









### अडचणींच्या पार्श्वभूमीवरही सातत्यपूर्ण सेवा

ज्या वेळी अडथळे येतात, टीका होते, साधनांची कमी भासते, तरीही कर्मचाऱ्यांची मानसिकता एकच असते "***सेवा हेच आमचं निःस्वार्थ व्रत***" या सेवेत ,कार्य आणि त्याग आहे. अनेकांनी आपल्या कुटुंबापासून दूर राहत, दैनंदिन झीज पत्करून विठोबाच्या दिंडीत आपले योगदान दिले.



### निष्कर्ष – ही आरोग्यसेवा नव्हे, ही 'वारीसेवा' आहे

या सेवेमागे असतो केवळ आदेश नव्हे, तर भाव. केवळ ड्युटी नव्हे, तर श्रद्धा.विठोबाच्या भक्तीत जेवढा भक्तीभाव आहे, तेवढाच वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेतही देव दर्शनाचे पुण्य आहे. "***भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची***" हे केवळ घोषवाक्य नसून, ती एक कार्यपद्धती आहे, एक संस्कार आहे आणि एक दीपस्तंभ आहे.



*विठ्ठल रखुमाईच्या चरणी ही सेवा अर्पण...वारकऱ्यांच्या पावलांमध्ये आरोग्याची वाटचाल...*
*हीच खरी विठोबाची सेवा!*

# महाआरोग्य शिबीर-२०२५

**स्थळ – तीन रस्ता, पंढरपूर**

**आरोग्य विभागाचे कर्मचारी आरोग्य सेवा पुरविताना**








'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची'

# सार्वजनिक आरोग्य विभागाने वारी मार्गावर पुरविली 9 लाखांहून अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा

## विविध माध्यमांतून आरोग्य जनजागृती



पुणे - आषाढी एकादशीनिमित्त देहू-आळंदी ते पंढरपूर व इतर जिल्ह्यांतून आलेल्या वारकरी भक्तांना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या उपक्रमांतर्गत 9 लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांना विनामूल्य आरोग्य तपासणी आणि औषधोपचारात्मक आरोग्य सेवा पुरविण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष उपक्रमाच्या माध्यमातून आरोग्य विभागाने 9 लाख 23 हजार 509 वारकऱ्यांना आतापर्यंत आरोग्य सेवा पुरविली असून, परतीच्या वारीमध्येही दि. 10 जुलैपर्यंत विभागामार्फत वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. पालखी मार्गावर 108 क्रमांकाच्या रुग्णवाहिकेमार्फत आतापर्यंत एकूण 1,114 वारकऱ्यांना अत्यावश्यक आरोग्य सेवा पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे या वारकऱ्यांना जीवनदान मिळाले आहे.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला निघालेल्या संतांच्या पालख्या आणि दिंड्यांमध्ये सहभागी झालेल्या लाखो वारकऱ्यांना रस्त्यात काही त्रास जाणवला की लगेच उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य विभागाने 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या उपक्रमाच्या माध्यमातून वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविली. या उपक्रमाच्या माध्यमातून पालखी मार्गावर आरोग्य विभागातर्फे प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, आरोग्य संदर्भ सेवा देण्यात आली. 5 चित्ररथांच्या माध्यमातून आरोग्य शिक्षण व जनजागृती करण्यासाठी विभागामार्फत नावीन्यपूर्ण व कल्पक पद्धतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. वारकऱ्यांना पालखी मार्गावर आणि मुक्कामाच्या ठिकाणी मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यासाठी विभागाचे 4,376 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ रात्रंदिवस कार्यरत होते.

पालखी मार्गावर वारीमध्ये डॉक्टर, नर्स, आरोग्य सहायक, आशा, आरोग्य सेवक, शिपाई, सफाईगार अशा सर्व कर्मचाऱ्यांनी सेवा दिली. पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर 'आपला दवाखाना' तात्पुरता उभारण्यात

आला होता. तातडीच्या आरोग्य सेवेसाठी फिरत्या दुचाकी वाहनासह आरोग्यदूत तैनात ठेवण्यात आले होते. आषाढी वारीमध्ये पालखी मार्गावर मोठी गर्दी असल्याने प्रत्येक ठिकाणी ॲम्बुलन्स फिरू शकत नाही, त्यामुळे फिरते दुचाकी आरोग्यदूत प्रथमोपचार पेटीसह सज्ज ठेवण्यात आले होते. त्यांच्या माध्यमातून वारकऱ्यांना तातडीची आरोग्य सेवा पुरविण्यात आली. याशिवाय 102 व 108 या क्रमांकाच्या ॲम्बुलन्सही पालखी मार्गावर सेवा देण्यासाठी कार्यरत होत्या. पालखीमध्ये दिंडी प्रमुखांना आरोग्य कीट देण्यात आली होती. याबरोबरच महिलांसाठी प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची सुविधा देण्यात आली. पुणे परिमंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद स्तरावरून 2 आरोग्य पथके सुसज्ज रुग्णवाहिकेसह अविरत पालखी परतेपर्यंत होते.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी दरम्यान 3,56,389 वारकऱ्यांना, श्री संत तुकाराम महाराज पालखी दरम्यान 2,29,183 तर श्री संत सोपानकाका महाराज पालखी दरम्यान 19,364 वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली आहे. मानाच्या इतर पालख्या व दिंड्यांमध्ये 85,386 वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्यात आली आहे. पंढरपूर - संस्था व एचबीटी (बूथ) मध्ये 62,670 वारकऱ्यांना, पंढरपूर – उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा आयसीयू.मध्ये 86,922 वारकऱ्यांना तसेच तीन रस्ता शिबिरामध्ये 83,595 वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली आहे. आरोग्य सेवा पुरविण्यात आलेल्या बाह्यरुग्ण संख्या 9,18,499 तर आंतररुग्ण संख्या 5,010 अशी एकूण 9,23,509 वारकरी भक्तांना आरोग्य सेवा पुरविण्यात आलेली आहे.

पालखी सोहळा २०२५ साठी
एकूण मनुष्यबळ – ४,३७६

प्रत्येक ५ किमी अंतरावर
'आपला दवाखाना' – २०३

वारी दरम्यान १०२ व १०८ रुग्णवाहिका
२४x७ उपलब्ध – ३३१

दिंडी प्रमुखांसाठी
औषधी कीट – ३५००

महिला वारकऱ्यांसाठी रुग्णालयामध्ये
कार्यरत स्त्री रोग तज्ज्ञ – १५

पालखी मुक्कामाच्या ठिकाणी
हिरकणी कक्ष – ३७

पालखी मार्गावर
आरोग्य दूत – २९०




पालखी सोबत माहिती, शिक्षण व
संदेशवहन चित्ररथ – ५

पालखी मुक्कामाच्या ठिकाणी ५ बेडची
क्षमता असलेले अतिदक्षता कक्ष – ४६

आरोग्य शिक्षण संवाद
आरोग्य ज्ञानेश्वरी उपक्रम

विविध माध्यमाद्वारे
आरोग्य जनजागृती

पालखी मार्गावरील सर्व हॉटेल्स व त्याअंतर्गत
असलेल्या कामगारांची आरोग्य तपासणी
तसेच पाणी नमुने तपासणी

पालखी मार्गावर १८६ टँकरद्वारे शुध्द
पाणी पुरवठा व मुक्कामाच्या ठिकाणी
धुर फवारणी.

पाण्याच्या सर्व स्रोतांची ओटी
टेस्ट तसेच आरोग्य संस्थांमार्फत
जैवकचरा विल्हेवाट

# मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन




सार्वजनिक आरोग्य विभाग व मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांच्या माध्यमातून वारकऱ्यांसाठी आरोग्य सेवा उपक्रम व चरण सेवा यासारखी भक्तीभावे आरोग्य सेवा यावेळी देण्यात आली. यात डॉक्टर्स, परिचारिका, कर्मचारी यांनी आपला सक्रिय सहभाग नोंदविला. त्याबद्दल माननीय मुख्यमंत्री यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

**देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

# आरोग्य मंत्र्यांकडून प्रशंसा



राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' हा उपक्रम यशस्वीरित्या राबविला. या उपक्रमांतर्गत ९ लाखांपेक्षा अधिक वारकरी भाविकांना आरोग्य सेवा पुरविली. देहू, आळंदी आणि राज्यभरातून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या पालख्या आणि दिंड्यामध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने सूक्ष्म नियोजन केले होते. त्याचप्रमाणे पंढरपूर येथे महाआरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करून वारकऱ्यांना आरोग्य दिली. आरोग्य विभागाच्या डॉक्टर्स, आरोग्य दूत, नर्स, आशा स्वयंसेविका आणि इतर कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी कष्ट करून जबाबदारीने अंमलबजावणी केल्याबद्दल सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कामगिरीवर मी समाधानी आहे.

**प्रकाश आबिटकर**
मा. मंत्री,
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण,
महाराष्ट्र शासन

# आरोग्य राज्य मंत्र्यांकडून अभिनंदन

लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची जबाबदारी पार पाडताना सार्वजनिक आरोग्य विभागाने यंदाही उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे, याचा मला अभिमान आहे. पालखी मार्गावर प्रत्येक टप्प्यावर आरोग्य केंद्रे, फिरते वैद्यकीय पथक, विशेष तपासणी व उपचार, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा यांसारख्या सुविधा देण्यात आल्या. डॉक्टर, नर्सेस, पॅरामेडिकल कर्मचारी आणि स्वयंसेवक यांनी अहोरात्र सेवा देऊन वारकऱ्यांची काळजी घेतली. संसर्गजन्य आजार, पायाला झालेली दुखापत, रक्तदाब, मधुमेह इ. बाबी लक्षात घेऊन वारकऱ्यांना तत्काळ उपचार देण्यात आले. आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेवर भर देत अनेक जनजागृतीसाठी उपक्रम राबविले. वारी काळात कोणतीही गंभीर घटना घडू न देता आरोग्य सेवा सुरळीत ठेवणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करते आणि भविष्यातही त्यांच्या हातून अशीच सेवा घडावी, अशी प्रार्थना करते.

**मेघना साकोरे- बोर्डीकर**
मा. राज्यमंत्री,
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र शासन



# ॥ भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ॥



## पंढरीच्या वारीत विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांद्वारे आरोग्य विभागाची जनजागृती

आषाढी वारीनिमित्त दरवर्षी आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठी प्रयत्न केले जातात. या वर्षीही 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या उपक्रमाच्या माध्यमातून वारीमध्ये आरोग्य विभागातर्फे प्रतिबंधात्मक व उपचारात्मक, आरोग्य संदर्भ सेवा देण्यात आली. आरोग्य शिक्षण व जनजागृती करण्यासाठी विभागामार्फत नावीन्यपूर्ण व कल्पक पद्धतीने उपक्रम राबविण्यात आले.

## ॥ आरोग्याची वारी पंढरीच्या दारी ॥



# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## आरोग्य दिंडी

आरोग्य संस्था, आरोग्य प्रशिक्षण संस्था व आरोग्य कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने पालखी व दिंडी प्रमुखांच्या सहकार्याने संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळा सुरु होणाऱ्या ठिकाणापासून आरोग्य दिंडीचे आयोजन करण्यात आले. आरोग्य दिंडीत सहभागी झालेल्या भाविकांना आरोग्य संदेश असलेल्या टोपी व उपरणे शाल देण्यात आली. आरोग्य दिंडी समोर आरोग्य विभागाच्या आरोग्य संदेश असणारे बॅनर्स लावण्यात आले होते.



# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## चित्ररथ

भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या घोषवाक्यासह चित्ररथाच्या माध्यमातून व लोक कलावंत यांच्या कलेद्वारे चित्ररथाच्या स्टेजवर व थांब्याच्या ठिकाणी कलेद्वारे आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम करण्यात आले. लोक कलावंतामार्फत जागृतीसाठी कीटकजन्य आजार, पावसाळ्यातील आजार, असंसर्गजन्य रोग, माता-बाल संगोपन, लसीकरण व शासनाचे जनतेसाठीचे उपक्रम याविषयीचे संदेश भारुड, भजन, कीर्तन व लोकगीत माध्यमातून तयार करण्यात आले आणि ते कलात्मक पद्धतीने सादर करण्यात आले.







# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## आरोग्य दूत

गर्दीच्या आणि अडचणीच्या ठिकाणी वारकऱ्यांना तातडीची मदत करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत दुचाकीसह फिरते आरोग्यदूत सज्ज ठेवण्यात आले होते. आरोग्यदुताच्या दुचाकी मोटरसायकलवर व मागे असणाऱ्या प्रथमोपचार पेटीवर आरोग्य संदेश लिहून जनजागृती करण्यात आली. आरोग्यदूतांमार्फत आरोग्य योजना पुस्तिका, विभागाची लोकोपयोगी निर्णय पुस्तिका वारकरी आणि रुग्णांना देण्यात आली. त्यामुळे योग्य आरोग्य संदेश लोकांपर्यंत पोहचविता आले.







# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## आरोग्य संदेश छत्री/तंबू

पालखी मार्गावरील थांब्याच्या ठिकाणी आरोग्य संदेश छत्री लावण्यात आल्या होत्या. या छत्र्यांवर आरोग्याचे संदेश मुद्रित करून जगजागृती करण्यात आली. या ठिकाणी फोल्डर, महाआरोग्य योजना पुस्तिका व आरोग्य पत्रिका, विभागाचे कार्यपुस्तिका वाचनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे आरोग्य विषयक बॅनर्स पोस्टर्स व आरोग्य शिक्षण साहित्यही प्रदर्शित करण्यात आले होते.









# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## बॅनर्स/ स्टिकर्स

दिंडी मार्ग, थांबे, उपचार केंद्रे येथे आरोग्य संदेश असलेले बॅनर्स लावण्यात आले होते. तसेच वारीत सहभागी झालेल्या वाहनांवर दिंडी प्रमुख यांच्या मान्यतेने स्टिकर्स लावून जनजागृती करण्यात आली.









# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## आरोग्य संदेश ऑडिओ व्हिडिओ

mahahealthiec या youtube चॅनलवर आरोग्य शिक्षण साहित्य उपलब्ध आहे. त्याचा वापर चित्ररथ, घंटागाड्या, रुग्णवाहिका यांच्या माध्यमातून करून जनजागृती करण्यात आली.









# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## होर्डिंग्ज

वारी मार्गावरील कीटकजन्य व जलजन्य आजार व वृद्ध वारकरी यांनी घ्यावयाची आरोग्य विषयक काळजी या विषयीचे संदेश यातून देण्यात आले.





## फ्लेक्स बोर्ड

होर्डिंग उपलब्ध नसलेल्या वारी मार्गावर आणि गावांच्या सुरुवातीला दर्शनी भागात फ्लेक्स बोर्ड लावून जनजागृती करण्यात आली.





# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## समाज माध्यमे

राज्यस्तरावरून समाज माध्यमाद्वारे जनजागृतीसाठी टीम तयार करण्यात आली होती. या टीमच्या माध्यमातून वारी काळात व्यापक पद्धतीने रिल्स, व्हिडिओ, बातमीपत्र तयार करून दररोज विभागाचे व माननीय मंत्री महोदय यांचे हँडल्स वरून प्रसारित करून आरोग्य संदेश देण्यात आले.








# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## दूरचित्रवाहिनीद्वारे संदेश प्रसारण

राज्यस्तरावर वारी काळात आरोग्य विभागाची उपलब्ध सेवा, भाविकांना आवाहन, आरोग्य संदेश यांची ऑडिओ, व्हिडिओ जाहिरात तयार करून वारी काळात दूरचित्रवाहिनीद्वारे व काही खासगी वाहिनीवर संदेश प्रसारण राज्य स्तरावरून करण्यात आले.









# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## वृत्तपत्र जाहिरात

महाआरोग्य शिबिरे, वारी मार्गावरील उपचार सेवा, विभागाच्या मार्फत राबविण्यात येणारे उपक्रम, याविषयी स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध करून माहिती देण्यात आली.









# आरोग्य विभागामार्फत जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम

## आरोग्य ज्ञानेश्वरी

वारी मार्गावर व मुक्काम ठिकाणी आरोग्याबाबत, आरोग्य योजनेबाबत व शासन राबवित असलेल्या उपक्रमाबाबत प्रश्न विचारून भक्तांचा प्रतिसाद नोंदविण्यात आला व त्यांचे चित्रीकरण करून प्रत्यक्ष व समाज माध्यमाद्वारे "आरोग्य ज्ञानेश्वरी" या उपक्रमाची व्यापक जनजागृती लोकसहभागातून करण्यात आली.









# पंढरपूर वारी दरम्यान 'दोस्त मुंबई'ने राबवली एनटीओआरसी बाबत विशेष जागृती मोहीम

अवयव दान ही काळाची गरज आहे. राज्यभरात अवयवादानाचे प्रमाण वाढण्यासाठी शासकीय पातळीवर अनेक प्रयत्न केले जात आहेत. शासनाच्या प्रयत्नांना बळकट करण्याच्या दृष्टीने व अवयव दानाचे प्रमाण वाढवण्याचे दृष्टीने दोस्त मुंबई ही संस्था अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. दोस्त चे संस्थापक व प्रत्यारोपण शल्यचिकित्सक डॉ कैलास जवादे यांनी 2015 पासून पंढरपूर वारीदरम्यान अवयव दान व आरोग्य सेवा दिंडीच्या माध्यमातून अवयवदान जनजागृती करण्याचे प्रयत्न चालू केले आहे केलेले आहेत. दरवर्षी जवळपास 50 जणांच्या टीमच्या माध्यमातून अवयव दान जनजागृतीचे कार्य केले जाते. पथनाट्य, भारुड, अभंग, चर्चासत्रे, माहिती पत्रकांचे वाटप इत्यादी माध्यमातून वारकऱ्यांना अवयव दानाविषयी माहिती दिली जाते. विशेष करून कीर्तनकार, प्रवचनकार आदींना ही माहिती देऊन समाजाच्या तळागाळापर्यंत अवदानाविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न दोस्त मुंबईने केलेला आहे. एकंदरीतच यामुळे जनसामान्यांमध्ये अवयव दानाविषयी जाणीव जागृती मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली आहे.

2025 हे अवयव दान व आरोग्यसेवा दिंडीचे अकरावे वर्ष असल्याने या वर्षांमध्ये विशेष मोहीम राबवण्याचे संस्थेने ठरवले होते. यापूर्वी अनेक वारकऱ्यांनी अवयवादानाची इच्छा व्यक्त केली होती परंतु आम्ही मुख्य शहरापासून दूर राहत असल्याने अवयवदान कसे करता येईल? हा त्यांचा प्रश्न होता. महाराष्ट्रातील कित्येक तालुक्यांमध्ये 50 खाटांपर्यंतची रुग्णालये तसेच आयसीयूच्या व ऑपरेशनच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत याच गोष्टीचा विचार करून संस्थेने वारी दरम्यान डॉक्टरांमध्ये एन टी ओ आर सी जनजागृती कार्यक्रम हाती घेण्याचे ठरवले.



25 बेड्स, 5 आयसीयू बेड्स व 1 शस्त्रक्रियागृह असणाऱ्या रुग्णालयास शासन एन टी ओ आर सी (नॉन ट्रांसप्लांट ऑर्गन रिट्रीव्हल सेंटर) म्हणून मान्यता देते. 2011 मध्ये याबाबतीत अवयव दान कायद्यामध्ये सुधारणा करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाने 2012 मध्ये याबाबतीत शासकीय आदेश काढून रुग्णालयांना सूचित केले होते. दुर्दैवाने याबद्दल वैद्यकीय क्षेत्रामध्ये जागृती नसल्याने अशा प्रकारच्या केंद्रांची संख्या कमी आहे. तालुका पातळीवरील रुग्णालयांना एनटीओआरसी म्हणून मान्यता मिळाल्यास तेथे उपचारासाठी आलेल्या मेंदू मृत रुग्णाचे अवयव दान करून घेणे शक्य होणार आहे. असे केल्याने अवयवादानाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढू शकते हा विचार करूनच संस्थेने पुण्यातील श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट सोबत हा कार्यक्रम हाती घेतला आहे.

पंढरपूरच्या वारी दरम्यान वारी मार्गातील पुणे, सासवड, बारामती, इंदापूर व अकलूज या ठिकाणी डॉक्टरांना भेटून त्यांच्यामध्ये एनटीओआरसी बद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे संस्थेने ठरवले होते. त्यासोबतच वारीदरम्यान भेटणारे डॉक्टर्स, प्रशासकीय अधिकारी व इतर महत्त्वाच्या व्यक्तींनाही याबद्दल माहिती द्यायची असे ठरवले होते. त्यानुसार, स्थानिक आयएमएच्या मदतीने ठिकठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक 21 जून रोजी पुणे येथे भाऊ रंगारी भावनांमध्ये याबाबतीत डॉक्टरांसोबत तसेच पत्रकारांसोबत चर्चा करण्यात आली व मोहिमेची माहिती देण्यात. याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष श्री संजीव जावळे, पुण्याचे आयएमएचे पूर्व अध्यक्ष डॉ रॉड्रिंग्स, हार्डीकर रुग्णालयाचे डॉ ओमकार लांडे, प्रशासकीय सेवेत कार्यरत डॉ महेंद्रकर आदी वैद्यकीय मान्यवर उपस्थित होते. कोंढवा येथील मॅपल गार्डन सोसायटीमध्ये झालेल्या कार्यक्रमांमध्ये डॉ

शिवराज पाटील व इतर डॉक्टरांना एनटीआरसी बद्दल माहिती देण्यात आली डॉ शिवराज पाटील यांनी त्यांच्या रुग्णालयास एनटीओआरसी नोंदणीकृत करून घेण्याचे मान्य केले.

दिनांक 23 व 24 जून रोजी सासवड व शिवरी येथे झालेल्या कार्यक्रमात पुरंदर मेडिकल असोसिएशन, कुर्ला घाटकोपर मेडिकल असोसिएशन तसेच रोटरी क्लब ऑफ सासवड च्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा झाली. डॉ राजेश दळवी, डॉ गजानन अकमार, डॉ प्रवीण जगताप, रोटरी क्लब ऑफ सासवड चे डॉ मधुसूदन झंवर, ग्रामीण रुग्णालय सासवडचे वैद्यकीय अधीक्षक डॉ वैभव तुरकाने, घाटकोपर मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ संजय सुराणा इत्यादी वैद्यकीय तज्ञांसोबत चर्चा करण्यात आली. लवकरच याबाबतीत सासवड येथे सीएमईचे आयोजन करण्याचे ठरवण्यात आले.

दिनांक 26 जून रोजी बारामती येथे भूलतज्ञ व सामाजिक सेवेची आवड असणारे डॉ सुजित अडसूळ तसेच गांधीवादी विचाराचे सामाजिक कार्यकर्ते श्री मेहबूब भाई कोरबू व निखिल भापकर यांनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. बारामती आय एम ए चे अध्यक्ष डॉ संतोष घालमे, गिरीराज हॉस्पिटलचे श्री सिद्धेश सावंत व गणेश देसाई, देशपांडे हॉस्पिटलच्या श्रीमती फातिमा मेहता व डॉ जाधव, पवार हॉस्पिटलचे डॉ महादेव कठुरे, बारामती हॉस्पिटलच्या डॉ नीती महादिवे व लाईफ लाईन हॉस्पिटलच्या डॉ सुजाता चव्हाण उपस्थित होत्या. याव्यतिरिक्त काही सामाजिक कार्यकर्ते देखील या कार्यक्रमास उपस्थित होते.

या कार्यक्रमात डॉ सुजित अडसूळ यांनी त्यांनी केलेल्या किडनी दानाविषयी माहिती दिली. घरातील एखाद्या व्यक्तीची किडनी निकामी झाल्यास काय समस्या उद्भवतात याविषयीचे भावनात्मक अनुभव त्यांनी व्यक्त केले. पहिल्यांदाच डॉ कैलास जवादे यांनी एन टी ओ आर सी बाबत तयार केलेले प्रेझेंटेशन सादर केले व एनटीआरसी बाबत सविस्तर माहिती रुग्णालयांना उपलब्ध करून दिली. रुग्णालयांच्या विविध शंकांचे समाधान करून त्यांना लवकरात लवकर नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

या कार्यक्रमात बारामती आयएमएचे अध्यक्ष डॉ संतोष घालमे यांनी आय एम ए च्या माध्यमातून महाराष्ट्रभर हा कार्यक्रम घेऊन जाण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले तसेच डॉ सुजित अडसूळ यांनी हे कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे मान्य केले. बारामती मध्ये लवकरात लवकर एनटीआरसी करून घेण्यासोबतच अवयव दानाविषयी एक जनजागृती मंच स्थापन करून लोकांमध्ये अवयव दानाविषयी व्यापक जनजागृती करण्याचे ठरवण्यात आले. याप्रसंगी दोस्त मुंबईच्या वतीने एन टी ओ आर सी बाबत सविस्तर माहिती तसेच शासकीय आदेश व नोंदणीसाठी आवश्यक प्रपत्र क्रमांक 13 च्या प्रती उपस्थित त्यांना प्रदान करण्यात आल्या.

कार्यक्रमानंतर बारामती येथील ज्येष्ठ वैद्यकीय तज्ञ डॉ रमेश भोईटे यांच्यासोबत विशेष चर्चा करण्यात आली. डॉ भोईटे यांनी दोस्त मुंबईने चालू केलेल्या या मोहिमेचे कौतुक करताना या मोहिमेसाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले.

दिनांक 28 जून रोजी इंदापूर शहरातील नीतू मांडके सभागृहात आयएमए इंदापूर व दोस्त मुंबई या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने अवयवदान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी इंदापूर आयएमएचे अध्यक्ष डॉ अनिल शिर्के, सचिव डॉ अविनाश बानगुडे इंडियन मेडिकल असोसिएशन चे स्टेट डायरेक्टर डॉ अशोक चंदावकर, डॉ सुधीर तांबिले, डॉ ठाकरे इत्यादी वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून देहू संस्थांचे विश्वस्त व पालखी सोहळ्याचे अध्यक्ष ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे उपस्थित होते. विशेष अतिथी





म्हणून संविधान दिंडीचे प्रमुख शामसुंदर सोन्नर महाराज, पतंजली इंदापूरचे पदाधिकारी व मुंबईतील जेष्ठ पत्रकार श्री प्रमोद चुंचूवार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ अविनाश पानबुडे यांनी अवयव दानाचे महत्त्व विशद करून केले. ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी आपल्या रसाळ वाणीतून सुदृढ शरीरासाठी आनंदी जीवन जगण्याचे महत्त्व व्यक्त करतानाच अवयव दान ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. वारकरी संप्रदाय अवयव दान चळवळीसाठी आवश्यक सहकार्य करेन असे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ कैलास जवादे यांनी पीपीटी च्या माध्यमातून उपस्थित सर्वांना एन टी ओ आर सी बाबत सविस्तर माहिती दिली. इंद्रेश्वर सुपर स्पेशालिटी रुग्णालय इंदापूर यांनी रुग्णालयास लवकरात लवकर एन टी ओ आर सी नोंदणीकृत करून घेण्याचे आश्वासन दिले.

दिनांक 30 जून रोजी अकलूज येथे आयएमए हॉलमध्ये कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमांमध्ये अकलूजचे प्रसिद्ध यूरोलॉजिस्ट डॉ अभिषेक गांधी, कार्डिओलॉजिस्ट डॉ सौरभ गांधी व डॉ अजित गांधी उपस्थित होते. या व्यतिरिक्त दोस्त मुंबई स्टुडन्ट फोरमचे माजी विद्यार्थी व सर्व सदस्य उपस्थित होते. मराठा उद्योजक लॉबीचे श्री बबन पवार उपस्थित होते. डॉ कैलास जवादे यांनी पीपीटी द्वारे उपस्थित सर्वांना एन टी ओ आर सी बद्दल सविस्तर माहिती दिली. त्यानंतर दोस्त मुंबई कला मंच च्या वतीने पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. याप्रसंगी डॉ अजित गांधी यांनी भविष्यामध्ये पुन्हा एकदा सर्व आयएमए सदस्यांसाठी कार्यक्रम घ्यावा असे सूचित केले. डॉ गांधी रक्तदान मोहिमेमध्ये सक्रिय असल्याने भविष्यात अवयव दानाच्या या कार्यातही ते योगदान करतील असे त्यांनी मान्य केले.

विविध ठिकाणी झालेल्या या कार्यक्रमा व्यतिरिक्त पालखी मार्गात वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टरांसोबत चर्चा करून त्यांना या मोहिमेवर बाबत अवगत करून देण्यात आले. श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त तसेच विविध दिंड्यांचे दिंड्या प्रमुख यांना देखील या मोहिमेबाबत अवगत करून देण्यात आले. पालखी मार्गात येत असणाऱ्या विविध वृत्तवाहिन्या व मेडिया शी संपर्क करून त्यांना एन टी ओ आर सी बद्दल माहिती देण्यात आली. या कार्यक्रमासाठी कॅराव्हॅन सखी ही चालते फिरत्या घरासारखी गाडी निर्माण करणाऱ्या सुनीता नेराळे मॅडम यांनी त्यांची व्हॅन उपलब्ध करून दिली होती. व्हॅन मध्ये बसण्याची व्यवस्था असल्याने दिंडी मार्गातिही मान्यवरांसोबत व्यवस्थित चर्चा करता आली व सर्वांनीच हा कार्यक्रम समजून घेतला.

महाराष्ट्रात विविध ठिकाणी असणाऱ्या 25 बेड्स, 5 आयसीयू बेड व एक ऑपरेशन थिएटर या सुविधा असणाऱ्या रुग्णालयांना एन टी ओ आर सी म्हणून मान्यता दिल्यास अवयव दानाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढू शकते हे या मोहिमेमध्ये सहभागी झालेल्याव सर्वांनीच मान्य केले. आय एम ए सारख्या मोठ्या संस्थेला सोबत घेऊन संपूर्ण महाराष्ट्रभर ही मोहीम राबवने गरजेचे असल्याचेही सर्वांनीच मान्य केले. दोस्त मुंबई संस्थेच्या वतीने याबाबतीत उचललेले हे पाऊल भविष्यामध्ये अवयव दान क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणेल हा विश्वास सर्वांनाच वाटला. दोस्तच्या अध्यक्ष डॉ वैशाली जवादे, दोस्त मुंबईचे जनसंपर्क अधिकारी श्रीकांत गावित, अवयव दान चळवळीतील कार्यकर्ते स्नेहल हांडे, श्रृतुजा खोडदे, प्रितेश गावंडे, यश सिंग व सृष्टी ओंबाळे या सर्वांनी ही विशेष मोहीम यशस्वी करण्यासाठी मौलिक योगदान दिले.

***अवयव दान दिंडी आली । विठ्ठलाचे द्वारी ॥***
***मिळो अवयव रुग्णा ।साकडे हे घाली ॥***

असे म्हणत अकरा वर्षापासून चालू असलेल्या अवयव दानाच्या या दिंडीचे साकडे विठ्ठलाने ऐकले असावे व त्यामुळेच एन टी ओ आर सी बाबत जागृतीचे कार्य संस्थेच्या माध्यमातून सुरु झाले आहे.

**डॉ कैलास जवादे**

|| भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ||

# माध्यम प्रतिसाद

आषाढी वारीसाठी आरोग्य विभाग

धाराशिव : चार प्रमुख पालख्यांचा १६ गावांत असतो मुक्काम

वारकऱ्यांच्या सेवेसाठी जिल्हा परिषदेचा पुढाकार

वारकऱ्यांची आरोग्य तपासणी

दिंडीतील वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी

वारकऱ्यांसाठी आरोग्य सेवा

'विठ्ठल विठ्ठल जयहरी विठ्ठल'

वारीदरम्यान मृत्यू झाल्यास चार लाखांची मदत

१२० रुग्णवाहिका २४ तास वारकऱ्यांना देतात तत्पर सेवा

८६४३ वारकऱ्यांची आरोग्यसेवा

# || भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ||

# माध्यम प्रतिसाद

## आरोग्याची वारी घरोघरी पोहोचवावी : आबिटकर

सकाळ 7

कोल्हापूर, ता. ६ : आरोग्याचे महत्त्व सर्वांना कळण्यासाठी प्रत्येक आरोग्य कर्मचाऱ्यांनी आरोग्याची वारी घरोघरी पोहोचवावी, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रातर्फे 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमांतर्गत आरोग्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याचा प्रारंभ मंत्री आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आला. 'जपुया वारसा संस्कृतीचा, घेऊ या आनंद आरोग्य वारीचा' या अंतर्गत भक्तिगीत गायनाचा कार्यक्रम झाला.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, 'अधिकारी - कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र अद्ययावत करण्यात यावेत. त्याचबरोबर त्यांच्या गरजा ओळखून, ... प्रशिक्षण देण्यावर भर ... हस्ते आरोग्य सेवक, ... परीक्षा प्रमाणपत्र ... यावेळी दिंडीमध्ये सह... कर्मचाऱ्यांनी वारीचा ... व टीबी यांसारख्या विषयांवर पथनाट्य सादर केली. महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पारंपरिक संस्कृतीचा वारसा जपत आरोग्याच्या ओव्या गायल्या. झिम्मा, फुगडी, रिंगण सोहळ्यांमध्ये आरोग्य शिक्षण देणारे फलक झळकावत जनजागृती केली. प्राचार्य डॉ. योगेश साळे यांनी प्रास्ताविक केले. नियोजन वैद्यकीय अधिकारी डॉ. विनायक भोई आणि आरोग्य शिक्षण विस्तार अधिकारी शकिला गोरवाडे यांनी केले. पर्यवेक्षक खोत, देशमुख यांनी आभार मानले.

## आरोग्याची वारी घरोघरी पोहोचवा

तरुण भारत

## एकमत

### सार्वजनिक आरोग्य विभागाने वारी मार्गावर पुरविली ९ लाखांहून अधिक वार...

# भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची'

विविध माध्यमातून आरोग्य जनजागृती

एकमत

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या ने...

# पुढारी

## नऊ लाख वारकऱ्यांनी घेतला आरोग्य सेवेचा लाभ

सकाळ 9/7/25

## 'आरोग्य'ची ४,२०६ वारकऱ्यांना सेवा

कोल्हापूर, ता. ८ : जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून श्री क्षेत्र पंढरपूर ४ हजार २०६ वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्यात आल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे यांनी दिली.

डॉ. पिंपळे म्हणाले, "जिल्ह्यातून यंदाच्या वर्षी ११८ दिंड्या गेल्या होत्या. त्यामध्ये ५० दिंड्या कोल्हापूर, आळंदीमार्गे पंढरपूरकडे तर ६८ दिंड्या कोल्हापूर, मिरजमार्गे पंढरपूरकडे गेल्या होत्या. या मार्गावरील मुख्य दिंडी कसबा सांगाव येथून प्रमुख तालुक्यातून मुक्काम करत पुढे गेल्या होत्या. या दरम्यान वारकऱ्यांना आरोग्य सेवा देण्यात आल्या. अत्यंत आपत्कालीन स्थितीत अपघात झालेले ... यात्रेदरम्यान डॉ. उत्तम मदने यांच्या नियंत्रणाखाली तीन पथके कार्यरत होती. चार १०२ रुग्णवाहिका, दोन १०८ रुग्ण वाहिकेद्वारे ४६३ रुग्णांना उपचार दिले. पाणिपुरवठा, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहायक, आरोग्यसेवक व सेविका, वाहन चालकांमार्फत पाणी शुद्धीकरण, हॉटेल तपासणी केली. पालकमंत्री प्रकाश आबिटकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ...

## भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची...

नवराष्ट्र

www.navarashtra.com

पंढरपूरमध्ये यंदा वारकऱ्यां...

पुण्यनगरी

## आषाढी वारीत ९ लाख वारकऱ्यांना आरोग्यसेवा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** आषाढी एकादशीनिमित्त देहू-आळंदी ते पंढरपूर व इतर जिल्ह्यांतून आलेल्या नऊ लाख वारकऱ्यांना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या उपक्रमांतर्गत विनामूल्य आरोग्यतपासणी औषधोपचाराची ... पुरविण्यात आली. पंढरपूर ... मूळ स्थानी पोहोचेपर्यंत ... प्रवासातही ही आरोग्यसे... राहणार आहे.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर ... जगद्गुरू श्री संत तुकाराम ... यांच्या पालख्यांसह ... विविध जिल्ह्यांतून एकादशीनिमित्त ... निघालेल्या संतांच्या पालख... दिंड्यांमध्ये सहभागी झाले... वारकऱ्यांना रस्त्यात का... जाणवला, की लगेच मिळवेत, यासाठी आरोग्य 'भक्ती विठोबाची, सेवा आ... या उपक्रमाच्या ...

## 'भक्ती विठोबाची, से...

...जागृती

नवराष्ट्र

www.navarashtra.com

### कुमार आशीर्वाद यांच्याकडून प्रभावी व्यवस्थापन

# आषाढी वारी यशस्वीतेत जिल्हाधिकाऱ्यांचे योगदान

नवराष्ट्र

www.navarashtra.com

### आरोग्य विभागाकडून वारीमार्गावर ९ लाख वारकऱ्यांची तपासणी

# विठ्ठलभक्तांची 'आरोग्य सेवा'

## ...वारीत १४७ रुग्णांची मोफत नेत्रतपासणी

विद्यार्थ्यांना चष्म्याचे वाटप

आरोग्य आणि आपत्ती व्यवस्थापन

जनसत्य

## आयुष्मान योजनेमुळे वारकऱ्यांचे वाचले प्राण

पुण्यनगरी

## साडेचार हजार वारकऱ्यांवर उपचार

भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची उपक्रम

तरुण भारत

## ...र्व पालखी मार्गावर सुविधांसाठी दक्ष रहा

# 'आई होण्यासाठी योग्य वय तेव्हा, शरीर व मनाची तयारी जेव्हा'

## जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने

आज 11 जुलै, जागतिक लोकसंख्या दिन. सन 1950 साली जगाची लोकसंख्या 250 कोटीच्या घरात होती. सन 1987 साली हि लोकसंख्या दुप्पट म्हणजे 500 कोटी झाल्याने वाढत चाललेल्या जागतिक लोकसंख्येच्या आकडेवारीला प्रतिबंध घालण्याच्या उद्देशाने 11 जुलै 1987 पासून जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो. या दिवशी लोकसंख्येशी संबंधित अनेक आव्हाने अधोरेखित केली जातात. वाढत्या जागतिक लोकसंख्येशी संबंधित वाढत्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो. दरवर्षी जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने दरवर्षी थीम जाहिर करण्यात येते. यंदाच्या लोकसंख्या दिनाची थीम "नियोजित पालकत्वासाठी आरोग्यदायी वेळ आणि गर्भधारणेमधील अंतर" अशी आहे. तसेच या दिनाचे घोषवाक्य "आई होण्यासाठी योग्य वय तेव्हा, शरीर व मनाची तयारी जेव्हा" असे आहे.



वातावरणातील नैसर्गिक संसाधने ज्या पध्दतीने कमी होत आहेत त्यासाठी वाढत चाललेली लोकसंख्या हे एक प्रमुख कारण आहे. आज लोकसंख्या वाढ हि केवळ कोण्या देशाची वा प्रांताची समस्या नाही तर संपूर्ण जगाची समस्या बनलेली आहे. लोकसंख्या वाढीने उदभवलेल्या ग्लोबल वार्मिंगची समस्या देखील प्रचंड मनस्ताप देऊ लागलेली आहे. प्रामुख्याने विकसनशील देशांमध्ये वाढत चाललेल्या लोकसंख्येचे विपरीत परिणाम दिसुन येत आहेत. प्रचंड प्रमाणात बेरोजगारी व गुन्हेगारीदेखील वाढलेली दिसते. वाढत्या लोकाद्रेकाने व मानवी गरजांनी निर्माण केलेल्या अनैसर्गिक व तांत्रिक गोष्टींमुळे निसर्गाची भयंकर हानी होऊन निसर्गव्यवस्थेचा विस्फोट होण्याची भीतीदेखील वाढ्लेली आहे. यामुळेच जागतिक पातळीवर लोकसंख्या वाढीची गंभीर दखल घेतली जात आहे. जगातील वाढत्या लोकसंख्येच्या समस्यांविषयी लोकांच्या मनात जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी 11 जुलैला जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो.

भारतामधील झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे अन्न, वस्त्र, निवारा, दारिद्र्य, बेकारी, महागाई आणि रोगराई असे अनेक प्रश्न उद्भवू लागले आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे देशाच्या प्रगतीला लोकसंख्यावाढ ही बाब अडसर ठरत आहे. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरुन व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत.

कुटुंब कल्याण व कुटुंब नियोजन कार्यक्रमांच्या व्याप्तीमुळे लोकसंख्यावाढीच्या गतीला खीळ बसवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागामध्ये लोकसंख्येचे प्रमाण कमी असले तरी वाढत्या शहरीकरणामुळे शहरी भागातील लोकसंख्यावाढीचा वाढता आलेख दखलपात्र ठरतो. ग्रामीण भागामध्ये 'आशा' कार्यकर्ती व आरोग्य केंद्रांमार्फत कुटुंब नियोजनासाठी लोकप्रबोधनाचे काम सुरु असून संपूर्ण आरोग्य विभागासाठी कुटुंब नियोजन व लिंग गुणोत्तरामधील तफावत भरुन काढण्यासारख्या योजना हया प्राधान्यक्रमाच्या आहेत. आज देशाची लोकसंख्या

साधारणतः 140 कोटीच्या वर असून यात राज्याच्या लोकसंख्येचा वाटा 12 कोटीच्या आसपास आहे. लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रमांमध्ये अधिक व्यापकता आणणे आवश्यक असून सर्व यंत्रणांसाठीच हे एक मोठे आव्हान आहे.

लोकसंख्येच्या बाबतीत आपला देश चीनलादेखील मागे टाकत आहे. ही हर्षाची नाही तर गंभीर व विचार मंथनाची बाब आहे. वाढत असलेल्या लोकसंख्येला आवश्यक सुविधा व पूरक गोष्टी निर्माण करणे हेदेखील एक आव्हान असून यामध्ये देशाला येत्या काळात मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागेल. वाढते शहरीकरण व वेडीवाकडी वाढत चाललेली उपनगरे, झपाट्याने वाढत चाललेल्या लोकसंख्येला अपुरी पडु लागलेली आहेत. या सर्वांचा ताण नागरी सुविधा प्रदान करणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांवर पडत आहे. क्षमतेपेक्षा अधिक जनसमुदायामुळे पडणारा अतिरीक्त ताण कमी करण्यासाठी शहरी भागातील अतिरीक्त (अतिक्रमित) बांधकामे पाडण्याचे धोरण स्वराज्य संस्थांनी पत्करले असले तरी हा उपाय वाढलेले लोंढे कमी करण्यासाठी पर्याय ठरू शकत नाही. आज गरीब श्रीमंतीमधील दरी वाढत चालली असून श्रीमंत हे अतिश्रीमंत होत आहेत तर गरिबांना दोन वेळचे जेवण देखील दुरापास्त झाले आहे. लोकसंख्या वाढीचा फटका सर्वात जास्त सर्वसामान्यांनाच बसत असून वाढत असलेली लोकसंख्या केवळ गरीब व श्रीमंत यांच्यातच विभागली जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे एकीकडे गाडी, बंगला अशी ऐशोआरामाची जीवनपध्दती तर दुसरीकडे दारिद्र्य, एक वेळची भूक भागविण्याची धडपड, असे आजचे चित्र दिसते. तेव्हा जनतेनेदेखील या बाबीचा अत्यंत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कुटुंब नियोजनाचे नियम समाजातील सर्वच घटकांनी काटेकोरपणे पाळले पाहिजेत. येणाऱ्या पिढ्याना समाजात सुखाने व सन्मानाने जगायचे असेल लोकसंख्या नियंत्रणासाठी शासनाच्या प्रयत्नांना सर्वांनी साथ दिली पाहिजे.

लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम सर्वत्र जाणवत असून याविषयी जनजागृतीची गरज निर्माण झाली आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी शासन दरवर्षी व्यापक प्रमाणावर जनजागृतीचे धोरण राबवत असुन या जनजागृतीने अपेक्षित बदल घडणेदेखील तीतकेच आवश्यक आहे. लोकसंख्यावाढ ही समस्या उग्र रुप धारण करीत असल्याने सामाजिक विकासाला खीळ बसत आहे. उपलब्ध साधन संपत्तीवर येत असलेल्या अतिरिक्त ताणामुळे लोकांना मूलभूत गरजा प्रदान करताना प्रशासनालाही कसरत करावी लागत आहे. मुलगाच हवा लालसेपोटी चार – पाच अपत्यांना जन्म दिला जातो. अशिक्षितपणा असलेल्या कुटुंबात लोकसंख्या वाढीची बीजे रुजल्याचे प्रामुख्याने दिसून येते. हे सर्व रोखणे काळाची गरज आहे. आज मुंबई पुण्यासारख्या ठिकाणी गर्दीने अगदी हद्दच ओलांडलेली आहे. जिकडे पहावे तिकडे नुसती माणसेच माणसे. रेल्वेसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांचा नियमित वापर करणाऱ्या लोकांना याची चांगलीच जाण आहे. हि परिस्थिती अचानक ओढवलेली नसून अनेक वर्षापासून चालत आलेला लोकांमधील निष्काळजीपणा व अलिप्तवादी वृत्ती याला कारणीभूत आहे. हे कुठंतरी थांबले पाहिजे, कुटुंब कबिला वाढविण्यामध्ये व्यस्त असलेल्या आपल्या समाजाला जागृततेची गरज आहे. यासाठी लोकप्रतिनिधी, विचारवंत, साहित्यिक, लेखक व विविध क्षेत्रांमध्ये नैपुण्य प्राप्त व्यक्ती खूप मोठी जबाबदारी पार पाडू शकतात.

देशात 'अच्छे दिन' आणण्यासाठी प्रथम लोकसंख्या वाढ आटोक्यात आणणे आवश्क आहे. लोकसंख्या वाढ हा अत्यंत संवेदनशील विषय असून ती रोखण्यासाठी व्यक्तिगत जबाबदारी निश्चित करून कठोर कायदे नियम अंमलात आणावे लागतील व त्याची अंमलबजावणीदेखील तितक्याच काटेकोरपणे करावी लागेल. व्यक्तिगत, कौटुंबिक व सामूहिक प्रयत्नांनी येणाऱ्या काळात लोकसंख्या वाढीच्या भस्मासुरावर आपण निश्चितच मात करु हाच संकल्प आपण आज जागतिक लोकसंख्या दिनाच्या दिवशी करू या.

**वैभव मोहन पाटील**
कक्ष अधिकारी (अभियान संचालक कक्ष)
आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

# कविता

## जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने

लहान कुटुंब सुखी कुटुंब

अरे अरे माणसा तू , वेडा कि खुळा रे
लहान कुटुंब सुखी कुटुंब ,  मंत्र हाच घे रे

मुले जरी असली, देवाघरची फुले
पृथ्वी आहे छोटी, कोण सांगे तुले

लोकसंख्या वाढे भारी, भुईला हा भार
सोसवे ना तिलाहि हा, माणसांचा बाजार

पुत्रप्राप्तीच्या ओढीने, मुले झाली चार
उदरनिर्वाहाच्या चिंतेने, झाला पार बेजार

कुटुंब नियोजनाची महती, समजून घे रे माणसा
जीवन आहे छोटे - क्षणभंकुर,
सोड मोठया परिवाराचा वसा

अफाट अशा ह्या दुनियेमध्ये, शोध कशाचा घ्यावा
जिकडे तिकडे लोकच लोक, सोयी कुणा धाव्या

स्त्री पुरुष समानतेचा, करतो आम्ही जागर
नियंत्रित करावा लागेल आम्हा,
लोकसंख्येचा हा सागर

वंश वाढीच्या आशेने, अंध झाले सारे
गर्दीच्या धुक्याने, लुप्त विकासाचे वारे

म्हणुन म्हणतो माणसा, निसर्ग नियम पाळ रे
लहान कुटुंब सुखी कुटुंब, मंत्र हाच घे रे

वैभव मोहन पाटील,
कक्ष अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय
मुंबई

## कविता

# || भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ||

पावलोपावली चालती, दिंडीत वारकरी,
विठू माऊलीच्या ओढीनेव, निघती पंढरी ।
त्या वाटेवर उभे आम्ही, सेवेस सज्ज,
आरोग्य हीच आमुची, निस्वार्थ पूजा अर्ज ।

सोडुनी सुख-दुःख, झिजती हे हात,
औषध, पाणी, फुंकर देई, मायेचं साथ।
ना कुठे थांबा, ना मागे वळण,
विठोबाच्या पावलाशी, सेवाभावाचं वळण।

घामाच्या धारा, उन्हाचे चटके,
तरीही न थकता, दिली मनातली सेवा हटके ।
कधी डॉक्टरी सल्ला, कधी मातृवत स्पर्श,
वारक-यांच्या मुखी फक्त - "धन्य तुझं दशनिर्ष!

"मायेन  लिहिलं, "सेवा आरोग्याची",
आणि हृदयात कोरलं - "भक्ती विठोबाची"!
ही सेवा नव्हे ड्युटी, ही आरतीची जोपासना,
या कार्यातच लाभे विठ्ठलाची प्रसन्न वासना।

माऊलीच्या नावाखाली, आरोग्याचा गजर,
जनजागृती, समुपदेशन, प्रत्येक पावलावर।
हा देव नाही फक्त मंदिरात दिसतो,
तो सेवकांच्या चेह-यात, प्रेमात उमटतो।

"भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची"
हीच आमुची वारी, हीच आमुची पूजा,
वारक-यांच्या आरोग्यात, आम्हा विठ्ठल भेटला दूजा।



**सार्वजनिक आरोग्य विभाग**

# कविता

## || आषाढीची वारी, आली पंढरीच्या दारी ||

आषाढीची वारी, आली पंढरीच्या दारी
पाहता विठ्ठल, सुखावले वारकरी

दिंडी चालतसे वाटेने, औढ असे पंढरीची
तृप्त झाले मन, पाय लागता पंढरी

आषाढीचा सण मोठा, चाले संतांच्या संगती
वारीचा देखणा सोहळा, शिण देहाचा तो हरी

नाही कमी कुठे पडती, सर्व सोयी वारी मिळती
आजाराला नाही थारा, औषधोपचार जागोजागी

रिंगणाचा तो सोहळा, नाही कुठे दिसे जगी
माझ्या विठुरायाच्या चरणी, सर्व सुखे आम्हा दिसती

चंद्रभागेच्या त्या तीरी, सर्व विघ्ने विसरती
रखुमाईच्या मंदिरी, मन शांत चित्त होई

वारीच्या ऊर्जेने, फिरता जड पावली
पुन्हा धाव घेऊ, मनी ठेवू विठू माऊली

शासनाच्या सोयी भारी, स्वच्छ निरोगी पंढरी
वारकरी उपचार घेती, महा आरोग्य शिबिरी

पंढरीचा सोहळा, नाही जगी कुठे दुसरा
एकदा तरी अनुभवा, संत भेटीचा हा मेळा

वैभव मोहन पाटील,
कक्ष अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय
मुंबई





कविता

# || वारी एका डॉक्टरची ||

नाही पंढरीला जाणे, नाही केली कधी वारी।
माझी कर्मभूमी 'क्लिनिक' हीच माझी 'पंढरी ।।

माझा 'स्टेथोस्कोप' माझे 'टाळ, विणा नि मृदुंग ।
फुले 'गोळ्यांची' घेऊन, रोज रंगतो 'अभंग' ।।

आजार त्यांचे सांगाया, जेव्हा येतात पेशंट।
त्यांचे डोळ्यातलं पाणी माझा 'चंद्रभागा काठ'।।

त्यांचे दुःख निवारून देते दान अभंगाचे।
काही वेगळे का आहे, पुण्य देव-दर्शनाचे ।।

व्याधी-निवारण व्रत हीच माझी एकादशी।
माझ्या पेशंटचे हास्य माझे प्रयाग नि काशी ।।

जेव्हा येतात पेशंट सुख-दुःख वाटायाला।
त्यांच्या रुपाने "विठ्ठल रोज येतो भेटायाला ।।

---

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

# कविता

## || ओवी आरोग्याची ||

पहिली माझी औवी गं, आरोग्य दिंडीला ।
आरोग्याचा संदेश ऐकण्या, तू ये रे बा विठ्ठला ।।१।।

दुसरी माझी औवी गं, लेक वाचवा अभियानाला ।
स्त्री जन्माचे स्वागत करण्या, तू ये रे बा विठ्ठला।।२।।

तिसरी माझी औवी गं, स्तनपान शिशुपोषणाला ।
बाळाचा हक्क देण्या, तू ये रे बा विठ्ठला ।।।।

चौथी माझी औवी गं, आरोग्य संस्थेत प्रसूतीला ।
प्रसूतीतून सुखरूप नेण्या, तू ये रे बा विठ्ठला ।।।।

पाचवी माझी औवी गं, साथ रोग टाळण्याला ।
टी सी एल युक्त पाणी पिण्या, तू ये रे बा विठ्ठला ।।५।।

सहावी माझी औवी गं, मर्यादीत कुटुंबाला ।
कुटुंबाचे कल्याण करण्या, तू ये रे बा विठ्ठला ।।।।

सातवी माझी औवी गं, स्वच्छता अभियानाला ।
साथीपासून रक्षण करण्या, तू ये रे बा विठ्ठला ।।।।

**सार्वजनिक आरोग्य विभाग**





# आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांना आरोग्य सेवा व जनजागृती करताना विभागाचे कर्मचारी













# आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांना आरोग्य सेवा व जनजागृती करताना विभागाचे कर्मचारी

















# आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांना आरोग्य सेवा व जनजागृती करताना विभागाचे कर्मचारी






















# आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्याकडून फलटण येथे आरोग्य सेवेचा आढावा



॥ आरोग्याची वारी पंढरीच्या दारी ॥

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर हजारो वारकरी पंढरपूरच्या दिशेने निघाले आहेत. या पारंपरिक आणि भक्तीमय यात्रा सुरक्षित आणि आरोग्यदृष्ट्या सुलभ होण्यासाठी, फलटण येथे आरोग्य विभागामार्फत विविध सोई-सुविधांची प्रभावी व्यवस्था करण्यात आली आहे.

तत्पूर्वी, या सुविधांचा आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी फलटण येथे प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घेतला. त्यामध्ये आरोग्य तपासणी केंद्रे, तात्पुरती दवाखाने, रुग्णवाहिका सेवा, स्वच्छ पिण्याचे पाणी, आणि स्वच्छतागृहांची उपलब्धता यांचा समावेश होता. याशिवाय, रुग्ण सेवा त्वरित मिळावी यासाठी वैद्यकीय पथकांनाही तैनात करण्यात आले आहे.

**वारकऱ्यांची श्रमसंपन्न आणि भक्तिभावयुक्त यात्रा अधिक सुलभ व सुरक्षित करण्यासाठी प्रशासन सज्ज.**



# ‘राष्ट्रीय आरोग्य निधी’ गरीब गरजू रुग्णांना दिलासा देणारी योजना

दुर्मिळ आजारांनी ग्रस्त असलेल्या दारिद्र्य रेषेखालील आर्थिकदृष्ट्या कमकुवत रुग्णांना सरकारी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी ‘राष्ट्रीय आरोग्य निधी’ (आरएएन) या योजनेंतर्गत आर्थिक मदत दिली जाते. या योजनेअंतर्गत ज्या गंभीर आजारांवर मोफत उपचार उपलब्ध नाहीत, त्यासाठी 15 लाखांपर्यंतची आर्थिक सहाय्य दिले जाते. गरीब आणि गरजू रुग्णांना सरकारी व सुपर स्पेशालिटी रुग्णालयांमध्ये उपचार घेण्यासाठी ही मदत मिळते.

या योजनेअंतर्गत हृदयविकार, किडनी व यकृत विकार, कर्करोग, न्यूरो-सर्जरी, हाडांचे आजार, दुर्मिळ आजार यांसारख्या जीवघेण्या आजारांवरील उपचारासाठी सरकारी सुपर स्पेशालिटी रुग्णालयांमध्ये एकरकमी आर्थिक मदत दिली जाते.

**राष्ट्रीय आरोग्य निधी (आरएएन) या छत्र योजनेत तीन घटकांचा समावेश आहे**

(1) राष्ट्रीय आरोग्य निधी (आरएएन), (2) आरोग्य मंत्री कर्करोग रुग्ण निधी (एचएमसीपीएफ) आणि (3) विशिष्ट दुर्मिळ आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी आर्थिक मदत योजना.

**आरएएन योजनेच्या तीन घटकांची उद्दिष्ट्ये**

(अ) राष्ट्रीय आरोग्य निधी दारिद्र्य रेषेखालील गरीब रुग्णांना आणि हृदय, मूत्रपिंड, यकृत इत्यादी जीवघेण्या आजारांनी ग्रस्त असलेल्यांना सुपर स्पेशालिटी सुविधा असलेल्या सरकारी रुग्णालये/संस्थांमध्ये उपचारांसाठी आर्थिक मदत प्रदान करेल.

(ब) दारिद्र्य रेषेखालील गरीब रुग्णांना आणि कर्करोगाने ग्रस्त असलेल्यांना प्रादेशिक कर्करोग केंद्रे (आरसीसीज)/तृतीय काळजी कर्करोग केंद्रे (टीसीसीसी) आणि राज्य कर्करोग संस्था (एससीआय) येथे उपचारांसाठी आर्थिक मदत प्रदान करण्यासाठी आरोग्य मंत्री कर्करोग रुग्ण निधी.

(क) दुर्मिळ आजारांनी ग्रस्त असलेल्या गरीब रुग्णांसाठी आर्थिक सहाय्य योजना – दारिद्र्य रेषेखालील आणि विशिष्ट दुर्मिळ आजारांनी ग्रस्त असलेल्या गरीब रुग्णांना सुपर स्पेशालिटी सुविधा असलेल्या सरकारी रुग्णालये/संस्थांमध्ये उपचारांसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे.

कोणत्या रुग्णांना मिळणार लाभ?

या योजनेचा लाभ राष्ट्रीय आरोग्य निधी (आरएएन) अंतर्गत समाविष्ट असलेल्या गंभीर आजारांवर उपचार घेणाऱ्या गरजू रुग्णांना मिळतो. मात्र, हे उपचार विनामूल्य उपलब्ध नसतील तरच मदत दिली जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना या योजनेतून दिलासा मिळतो.

**कोणते आजार यामध्ये येतात?**

कर्करोग (कॅन्सर), हृदयविकार, मूत्रपिंड/यकृत निकामी होणे
मेंदू व मज्जासंस्थेचे आजार, थॅलेसेमिया व इतर रक्ताचे आजार
इतर जीवघेणे आजार (डॉक्टरच्या सल्ल्यानुसार)

**योजनेच्या महत्त्वाच्या अटी व पात्रता :**

- रुग्ण गरीबी रेषेखालील(बीपीएल) असावा. उत्पन्न मर्यादा राज्यनिहाय निश्चित करण्यात आली आहे
- लाभार्थी शासकीय कर्मचारी किंवा पेंशनधारक नसावा.
- प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी (आयुष्मान भारत) आरएएनअंतर्गत पात्र ठरत नाहीत.
- उपचार फक्त सरकारी सुपर स्पेशालिटी रुग्णालयात झाले पाहिजेत.
- कमाल आर्थिक मदत ₹15 लाखांपर्यंत दिली जाऊ शकते.
- काही शासकीय रुग्णालयांमध्ये रिव्हाल्विंग फंड उपलब्ध असून त्वरित ₹5 लाखांपर्यंत मदत मिळते.

**अर्ज प्रक्रिया :**

- संबंधित सरकारी रुग्णालयातूनच अर्ज सादर करावा लागतो.
- अर्जासोबत उत्पन्न प्रमाणपत्र, रेशन कार्ड, आधार कार्ड, निदान व उपचार अहवाल जोडणे आवश्यक.
- अर्जावर डॉक्टर आणि रुग्णालय अधीक्षक यांची स्वाक्षरी आवश्यक.

**लाभ घेण्यासाठी संपर्क:**

राज्यातील शासकीय सुपर स्पेशालिटी रुग्णालये, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालये किंवा सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे.

जीवनदायी उपचारांसाठी पैशाअभावी कोणीही वंचित राहू नये, यासाठी केंद्र शासनाची ही योजना अत्यंत प्रभावी ठरत आहे. अधिक माहितीसाठी आरोग्य हेल्पलाईन 104/1075 किंवा https://main.mohfw.gov.in या संकेतस्थळावर संपर्क साधावा. राज्यातील पात्र नागरिकांनी तिचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# लेखकांना विनंती

वाचकांचे मनोगत हे सदर लवकरच सुरु करीत आहोत,
तरी लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय ई-मेल आयडीवर अवश्य कळवावा.
**e-mail: ddhsiec.creatives@gmail.com**

- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेत आरोग्यासंबंधीच्या विषयांवर लेख, कविता,यशकथा इत्यादी साहित्य प्रकाशित केले जाते.
- साहित्य अप्रकाशित असावे. लेख मुख्य संपादक तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.ब्युरो) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 411006 या पत्त्यावर पाठवावेत. लेखकांनी स्वतःचा पूर्ण पत्ता दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी लिहावा.
- केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा क्षेत्र अनुभवांवरील साहित्याला प्राधान्य देण्यात येते. फक्त मराठी भाषेतील मजकुर प्रसिद्ध होतो.
- लेख/साहित्य प्राप्त झाल्यावर निवड समितीच्या मान्यतेने साहित्याची निवड केली जाते. अस्वीकृत साहित्य परत पाठविणे शक्य होत नाही. आपले लेख कागदाच्या एका बाजूस सुवाच्य अक्षरात लिहून किंवा टंकलिखित करुन पाठवावेत. शब्द संख्या 700 ते 800 असावी.
- अपेक्षित महिन्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर संबंधित लेख या कार्यालयास प्राप्त झाल्यास छपाईचे योग्य काम योग्य वेळेत पूर्ण होऊ शकते. पुढील 3 महिन्यांसाठीचे विषय पुढे दिले आहेत.

## आरोग्य पत्रिकेसाठी पुढील महिन्यांसाठीचे विषय

### ऑगस्ट २०२५

| | |
|---|---|
| **१ ते ७ ऑगस्ट** | स्तनपान सप्ताह |
| **६ ऑगस्ट** | जागतिक हिरोशिमा दिन |
| **१० ऑगस्ट** | राष्ट्रीय जंतनाशक दिन |
| **१२ ते २५ ऑगस्ट** | जागतिक युवा पंधरवडा |

### सप्टेंबर २०२५

| | |
|---|---|
| **१ ते ३० सप्टेंबर** | पोषाहार महिना |
| **५ सप्टेंबर** | राष्ट्रीय शिक्षक दिन व मज्जारज्जू दुखापत दिन |
| **८ सप्टेंबर** | जागतिक साक्षरता दिन |
| **१० सप्टेंबर** | जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन |
| **१६ सप्टेंबर** | जागतिक ओझोन दिन व जागतिक अस्थिमज्जा दाता दिन |
| **२१ सप्टेंबर** | क्षारसंजीवनी दिन |
| **२५ सप्टेंबर** | जागतिक औषधनिर्माता दिन |
| **२८ सप्टेंबर** | जागतिक रेबीज दिन |
| **२९ सप्टेंबर** | जागतिक हृदय दिन |
| **सप्टेंबर** | जागतिक कर्णबधिरता |

### ऑक्टोबर २०२५

| | |
|---|---|
| **१ ऑक्टोबर** | रक्तदान दिन व ज्येष्ठ नागरिक दिन व जागतिक शाकाहार दिन स्तनाचा कर्करोग जागरूकता महिना |
| **२ ऑक्टोबर** | स्वच्छता दिन व राष्ट्रीय व्यसनाधिनता प्रतिरोध दिन |
| **७ ऑक्टोबर** | जागतिक सेरेब्रल पाल्सी दिन |
| **९ ऑक्टोबर** | जागतिक दृष्टी दिन |
| **१० ऑक्टोबर** | मानसिक आरोग्य दिन |
| **११ ऑक्टोबर** | जागतिक बालिका दिन |
| **१२ ऑक्टोबर** | जागतिक संधिवात दिन |
| **१३ ऑक्टोबर** | जागतिक थ्रोम्बोसीस दिन |
| **१५ ऑक्टोबर** | जागतिक हाताची स्वच्छता जागरुकता दिन |
| **१६ ऑक्टोबर** | जागतिक अन्न दिन व जागतिक बधिरीकरण दिन |
| **१७ ऑक्टोबर** | जागतिक आघात दिन |
| **१८ ऑक्टोबर** | जागतिक रजोनिवृत्ती दिन |
| **२० ऑक्टोबर** | जागतिक अस्थी विर्दीणता दिन |
| **२१ ऑक्टोबर** | जागतिक आयोडीन न्यूनता विकार नियंत्रण दिन |
| **२४ ऑक्टोबर** | जागतिक पोलिओ दिन |
| **२६ ऑक्टोबर** | जागतिक स्थूलता दिन |
| **२९ ऑक्टोबर** | जागतिक पक्षाघात दिन |

(या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ व शासन सहमत असतीलच असे नाही. तसेच लेखातील विषयाबाबत अधिक माहितीसाठी कृपया लेखकांशी संपर्क साधावा)

**पत्र व्यवहारासाठी पत्ता**

मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक
आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,
परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस
स्टेशन समोर, येरवडा,
पुणे 411006

## सर्व सरकारी आरोग्य योजना आणि कार्यक्रमांची माहिती जाणून घेण्यासाठी

# महाआरोग्य योजना पुस्तिका




महाआरोग्य योजना पुस्तिका डाऊनलोड करण्यासाठी शेजारील QR कोड स्कॅन करा

Registered
Maharashtra Arogya Patrika (Marathi)
**RNI No. MAHMAR/2000/1736**
The date of Publication is 24th July 2025

# विनम्र आभार!

## सार्वजनिक आरोग्य विभागाची कामगिरी !

## ९ लाखापेक्षा अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा

आषाढी वारीनिमित्त पालखी मार्ग आणि पंढरपुरातील
महाआरोग्य शिबिरात वारकऱ्यांना दर्जेदार आरोग्य सेवा
पुरविण्यासाठी अहोरात्र काम करणाऱ्या
सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व अधिकारी,
विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी, आरोग्यदूत, पॅरामेडिकल स्टाफ, नर्सेस,
आशा स्वयंसेविका, इतर कर्मचारी वर्ग, स्वयंसेवकांचे
विनम्र आभार !

Monthly Maharashtra Arogya Patrika is published by
Dr. Kailas B. Baviskar on behalf of Public Health Department, Government of Maharashtra at
Maharashtra State Health I.E.C. Bureau, Parivartan', Arogya Bhavan Compound, Opp. Vishrantwadi Police Station, Yerawada, Pune 411 006.